स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**मुख्य कार्यालय, विरार**

**विरार (प).**

**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

वसई-विरार शहर महानगरपालिका
स्थापना ०३ जुलै २००९

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. : व.वि.श.म./मा.तं/३५१ /24-25
दिनांक : २५ /०३/2025

# जाहिर दरपत्रक सुचना

वसई विरार शहर महानगरपालिकेचे सोशल मिडीया अकाऊंट अधिकृत खरेदी करुन कार्यान्वित करणेकामी एजन्सी नियुक्त करणेस जाहीर दरपत्रक सुचना www.vvcmc.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन दि.२६/०३/२०२५ रोजी ११.०० वाजल्यापासून ते दि.०१/०४/२०२५ रोजी ४.०० वाजेपर्यत या कालावधीत इच्छूक संस्था व पुरवठादार यांचेकडुन दरपत्रके मागविण्यात येत आहेत. दरपत्रकधारकाने सदर कामाचे दरपत्रक बंद लिफाफ्यामध्ये दि.१/०४/२०२५ रोजी ४.०० वाजेपर्यंत नवीन प्रशासकीय इमारत, सातवा मजला, माहिती तंत्रज्ञान विभाग, विराट नगर, विरार (प) येथे सादर करावे. प्राप्त झालेले दरपत्रक दि.०१/०४/२०२५ रोजी दु.४.३० वाजता शक्य झाल्यास ठेकेदार स्वत: किंवा त्यांचे प्रतिनिधी यांच्या समक्ष मा.उपायुक्त (माहिती तंत्रज्ञान विभाग) यांच्या दालनात उघडण्यात येतील.

| अनु. क्र. | तपशिल | प्रति वर्ष रक्कम | एकूण त्रैवार्षीक रक्कम |
|---|---|---|---|
| १ | Meta Plan (तीन वर्षाकरीता अधिकृत करणे कामी)<br>• फेसबुक Blue Tick<br>• इन्स्टाग्राम Blue Tick<br>• व्हॉट्सअॅप Green Tick | | |
| २ | ट्विटर Blue Tick | | |
| | GST | | |
| | **एकूण** | | |

## अटी व शर्ती

१. उशीराने आलेले, अर्धवट भरलेले, खाडाखोड करुन साक्षांकित केलेले व सशर्त दरपत्रक फेटाळण्यात येतील.

२. दरपत्रकांचे लिफाफे सिल केलेले असावेत, एकदा सादर केलेली दरपत्रके विनंती अर्ज देवूनही परत घेता येणार नाही.

३. दरपत्रक धारकांने दरपत्रक भरताना द्विलखोटा पद्धतीचा अवलबंन करावयाचा आहे.

४. पहिला लखोटा हा तांत्रिक बाबींचा असून त्यामध्ये दरपत्रकधारकाने खालील प्रमाणे सादर करावे.

अ) स्वत:चे/संस्थेचे पॅनकार्ड,

आ) वस्तू व सेवा कर प्रमाणपत्र (GST Certificate)

इ) कंपनी नोंदणी प्रमाणपत्र

ई) इसारा रक्कमेचा धनाकर्ष (रु.५,१३४/-)

उक्त कागदपत्रे स्वयंसाक्षांकित छायांकित प्रती तांत्रिक बाबींचा लखोट्यासोबत सादर करावयाची आहेत.

५. दुसरा लखोटा हा वित्तीय बाबींचा असून त्यामध्ये दरपत्रकधारकाने उक्त नमुद बाबींकरीता असलेले दर (सर्व करांसहीत) स्वत:च्या/ संस्थेच्या लेटरहेड वर नमुद करुन सादर करावयाचे आहे.

६. दोनही लखोटे सिलबंद करावयाचे आहे.

७. सदर दरपत्रकासोबत अंदाजीत कामाच्या १% इसारा रक्कम रु. ५,१३४/- इतकी धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) द्वारे जमा करावयाची आहे.

८. लघुत्तम (L१) निविदाकाराचा निर्णय वित्तीय लिफाफ्यातील एकूण रक्कमेच्या आधारे घेण्यात येईल.

९. प्राप्त दरपत्रकातील L१ दरपत्रकधाराकाचे दर मंजूर होऊन सदर कामाचा कार्यादेश दिल्यांनतर उर्वरित दरपत्रकधारकांची इसारा रक्कम (धनाकर्ष) परत करण्यात येईल.

१०. मंजूर ठेकेदारास आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

११. कामाबाबत काही वादविवाद निर्माण झाल्यास महानगरपालिकेचा निर्णय अंतिम राहील व त्याचे पालन दरपत्रकधारकांस बंधकारक राहील.

१२. मंजूर L१ दरपत्रकधारकास कामाच्या ३% सुरक्षा अनामत रक्कम जमा करणे अनिवार्य राहील.

१३. मुदतीत प्राप्त झालेले दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार मा.उपायुक्त, माहिती तंत्रज्ञान विभाग यांना राहील.

१४. कमी दराच्या ठेकेदारास १०००/- रुपयांच्या स्टॅम पेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल.

१५. बिल अदा केल्यानंतर लेखापरिक्षणास काही आक्षेप निघाल्यास त्याची पुर्तता करून देणे ठेकेदारास बंधनकारक राहील.

उपायुक्त
माहिती तंत्रज्ञान विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका